N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** वारजे माळवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0128 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/03/2024 06:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 27/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/03/2024
**Time From (वेळेपासून):** 20:48 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/03/2024 **Time (वेळ):** 06:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/03/2024 06:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मातोश्री वध्दाश्रमाचे भिंती ,लगत कर्नरचे पानटपरी समोर , कर्वेनगर पुणे ,विठ्ठल मंदिर भाजी मंडई,
(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनोहर कृष्णा पासलकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिध्दीविनायक बिल्डींग, अहिरा , गेट, उत्तमनगर, पुणे,वारजे माळवाडी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिध्दीविनायक बिल्डींग, अहिरा , गेट, उत्तमनगर, पुणे,वारजे माळवाडी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9284705409

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विठ्ठल वामन धाडगे | | | 1. ग्रामसेवक, नेमणुक - मुपो , वरसगाव, तावेल्हे, जिपुणे,,वारजे माळवाडी ,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु.)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | सनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक फिकट निळ्या रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल हन्डसेट, मडेल न V2246, सिरीयल न 10BD750DLR000उझ, आयएम | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 5000/ रुपये रोख रक्कम | 5,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | एक खाकी रंगाचा कलर असलेला हाफ बाही शर्ट, पुढील डाव्या बाजुस एक खिसा, कलरचे खाली टिकार टेलर्स एण् | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दिनांक - 28/03/2024
माझे नाव मनोहर कृष्णा पासलकर, वय 45 वर्ष, धंदा - व्यवसाय, रा. सिध्दीविनायक बिल्डींग, अहिरे गेट, उत्तमनगर, पुणे मो.नं.9284705409
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहणेस आहे. मी अपंग असुन माझा स्वतःचा आय प्लस ऑपटीक अॅण्ड वॉच नावाचे शॉप गुलाबराव ताठे चौक, सहवास बस स्टॉपजवळ, कर्वेनगर, पुणे येथे असुन चष्म्याचे नंबर तपासून चष्मा देणे, दुरुस्ती करणे, घड्याळाची दुरुस्ती व विक्री करण्याचा व्यवसाय असून त्यातून मिळणारे उत्पन्नावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.
मी दिनांक 26/03/2024 रोजी फोन करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांचेकडे लोकसेवक लाच मागत असलेबाबत तक्रार केली होती त्याअनुषंगाने मला श्रीमती विद्युलता चव्हाण मॅडम यांचा फोन आला होता. त्यांनतर मी त्यांना सांगितले होते की, मी अपंग असल्याने व माझी तब्येत ठिक नसल्याने मी आपले कार्यालयात येवु शकत नाही. आपण उदया दिनांक 27/03/2024 रोजी माझे दुकानाचे वरील पत्त्यावर या मी माझी लेखी तक्रार देतो. त्याप्रमाणे आज दिनांक 27/03/2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.पुणे, त्यांचे सोबत सापळा पथकातील स्टाफ व दोन इसम होते. त्यानंतर मॅडम यांनी त्यांचे सोबत असलेल्या स्टाफची व पंचाची ओळख करुन दिली. त्यावेळेस चव्हाण मॅडम यांनी मला कागद देवुन तक्रार लिहून देण्यास सांगितलेमुळे मी माझी लेखी तक्रार श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.पुणे यांना पंचासमक्ष दिली सदरचे तक्रारीवर मी, पोनि/विद्युलता चव्हाण व पंच यांनी सह्या केल्या आहेत. सदरची तक्रार खालीलप्रमाणे -
माझे मुळगाव मु.पो वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे येथे असुन सदर गावात माझे वडिलोपार्जीत मिळकत घर, नं. 26 आहे. तसेच मिळकत घर नं. 25 ही माझे चुलते गुलाब गणपत पासलकर व सुभद्रा गुलाब पासलकर यांचे नावे होती. ती मिळकत घर नं. 25 ही बक्षीसपत्र करुन माझी आई नामे जनाबाई कृष्णा पासलकर यांचे नावे करण्यात आली होती. मिळकत नं. 25 व 26 याचे क्षेत्र एकत्र करुन त्याची नोंद 8 अ मध्ये केली गेली होती. सदरच्या दोन्ही मिळकतीच्या क्षेत्राची नोंद दुरुस्त करुन मिळकत नं. 26 चा 8 अ चा उतारा माझे नावे दुरुस्त करणेसाठी व

मिळकत नं. 25 चा 8 अ चा उतारा माझी आई नामे जनाबाई कृष्णा पासलकर यांचे नावे दुरुस्त करणेसाठी ग्रामसेवक श्री विठ्ठल घाडगे यांना संपर्क केला असता, त्यांनी माझे वरील दुरुस्तीचे कामाकरीता दिनांक 21/02/2024 रोजी माझे गुगल पे नं. 9284705409 यावरुन श्री घाडगे यांचे गुगल पे नं. 9890237223 यांचेवर 3000/- रु. रक्कम घेतली. तसेच ग्रामसेवक घाडगे यांना दिनांक 05/03/2024 रोजी नवले ब्रिज, ता. पुणे येथे समक्ष भेटलो असता, धरपडी करापोटी माझे गुगल पे नं. 9284705409 यांचेवरुन श्री घाडगे यांचे गुगल पे नं. 9890237223 यांचेवर 9984/- रु.रक्कम पाठविली व त्याबाबतची पावती मला दिली.
त्यानंतर ग्रामसेवक श्री. विठ्ठल घाडगे यांनी दिनांक 26/03/2024 रोजी माझे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन मिळकत घर नं. 26 व मिळकत घर नं. 25 ची 8 अ दुरुस्ती करणेसाठी व संगणीकृत 8 अ चा उतारा देणेकामी 5000/- रु. दयावे लागतील असे सांगितले. व 5000/- रु.रक्कमेची मागणी केली व मागणी केलेली रक्कम देणेबाबत दिनांक 27/03/2024 रोजी मला फोन करणेबाबत सांगितले आहे. सदरची रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने व मला त्यांना पैसे दयायची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली होती.
त्यानंतर चव्हाण मॅडम यांनी मला तक्रारीची पडताळणी करावी लागेल असे सांगुन त्याबाबत

-2-

माहिती दिली व नवीन सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबीचे मेमरी कार्ड सीलबंद वेष्टनातून पंचासमक्ष बाहेर काढून ते व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकुन माझे व पंच क्र. 1 गायकवाड यांचे निवेदन घेतले. श्री. घाडगे ग्रामसेवक यांनी मला मातोश्री वृध्दाश्रमाजवळ, विठ्ठल मंदिर भाजी मंडई, कर्वे रोड, कर्वे नगर, पुणे येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पोनि/विद्युलता चव्हाण यांनी सांगितले वरुन स्टाफ मधील वेताळ मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे अंगातील बनियनला आतून लावलेनंतर मी व पंच गायकवाड असे आम्ही माझे अॅक्टीव्हावरुन माझे दुकानातून निघुन मातोश्री वृध्दाश्रमाजवळ, विठ्ठल मंदिर भाजी मंडई, कर्वे रोड, कर्वे नगर, पुणे येथे अंदाजे 20.00 वा. सुमारास पोहचलो. श्री. घाडगे ग्रामसेवक यांना मी व पंच गायकवाड भेटलो असता घाडगे मला म्हणाले की, जाऊ द्या मला, मला पण काम हे, बघा आता तुम्हीच काय? राहिले ते बाकीचे देवुन टाका, पाच द्या. पहिले तीन राहिले होते, आताचे दोन देवुन टाका सात हजार खर्च आलाय मला असे बोलले, म्हणून पाच मिनीटात आलो मी असे सांगुन आम्ही निघालो असता, ग्रामसेवक श्री घाडगे यांनी इशारा करुन पंच क्र. 1 गायकवाड यांना त्याचे जवळ थांबण्यास सांगितलेमुळे मी पंच क्र. 1 गायकवाड यांना थांबण्यास सागुन, मी एकटाचा 20.23 वा. माझे दुकानावर परत आलो असता व्हाईस रेकॉर्डर माझेकडून घेऊन बंद करुन काय काय झाले ते चव्हाण मॅडम यांनी विचारले. त्यावेळी मी त्यांना वरील प्रमाणे पंच क्र. 2 यांचे समक्ष घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर त्यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉरडींग फास्ट फॉरवडिंग करुन ऐकली असता, ग्रामसेवक श्री.घाडगे यांनी माझ्याकडे 5 हजार रुपयांची लाच मागणी केल्याची खात्री झाली.
त्यानंतर चव्हाण मॅडम यांनी अंथ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले. मी सोबत आणलेले 500/- रुपये दराच्या 10 नोटा मिळून एकुण 5,000/- रुपये चव्हाण मॅडम यांनी सांगितले वरुन स्टाफमधील शिंदे यांचेकडे दिले. त्यानंतर त्यांनी पावडर लावून नोटा माझ्या अंगातील शर्टाचे डावे खिशयात ठेवल्या. नंतर सूचना दिल्या की, ग्रामसेवक श्री घाडगे यांनी लाच रक्कमेचा स्विकार केल्यानंतर तुमचे हातातील घडयाळ काढून सापळा पथकास इशारा करायचे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे बनियनला आतील बाजूने चालू करुन लावला. मी माझे अॅक्टीव्हावरुन पुढे व माझ्या मागोमाग लगेच शासकीय वाहनाने सापळा पथक असे 20.37 वा. निघालो. मी प्रथम मातोश्री वृध्दाश्रमाचे समोर गेलो. तेथे पंच क्र. 1 गायकवाड व ग्रामसेवक श्री. घाडगे उभे होते. त्यानंतर आम्ही सर्व बोलत बोलत पुढे गेलो व मातोश्री वृध्दाश्रमाचे भिंती लगत कॉर्नरचे पानटपरी समोर विठ्ठल मंदिर भाजी मंडई कर्वे रोड येथे नेले व सदर ठिकाणी ग्रामसेवक श्री.घाडगे लाचेची रक्कम स्विकारली त्यानंतर मी हातातील घडयाळ काढून सापळा पथकास नियोजीत इशारा केला असता ग्रामसेवक श्री.घाडगे यांना जागीच पंचासमक्ष सापळा पथकाने पकडले. त्यावेळी रात्रीचे 20.48 वा. होते.
तरी लोकसेवक श्री.विठ्ठल वामन घाडगे, पद - ग्रामसेवक, नेमणुक - मु.पो वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे यांनी मिळकत घर नं. 26 व मिळकत घर नं. 25 ची 8 अ उता-या मध्ये दुरुस्ती करुन त्याचे संगणीकृत 8 अ उतारा देणेकरीता 5,000/- रुपयाची लाच मागणी केली व सदर लाच रक्कम लोकसेवक श्री.विठ्ठल वामन घाडगे, ग्रामसेवक, यांनी दि. 27/03/2024 रोजी 20.48 पंचासमक्ष स्विकारली म्हणून लोकसेवक श्री विठ्ठल वामन घाडगे, पद - ग्रामसेवक, नेमणुक - मु.पो वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे यांचेविरुध्द माझी कायदेशीर तक्रार आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब संगणकावर टकलिखीत केला असून, तो मी वाचून पाहिला, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर

व खरा आहे.
समक्ष                हे लिहून दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MANOJ EKNATH SHEDGE(I (Inspector)) /                **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):                **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Pasalkar (PASALKAR .M.K)

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MANOJ EKNATH SH

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
वारजे माळवाडी पोलीस ठाणे
पुणे शहर